संदर्भ क्र.: एमएमसीसी/ महाडीबीटी स्कॉलरशिप फ्रीशिप /२०२५–२०२६/३८ दिनांक: २५/०२/२०२६

नोटीस

अतिमहत्त्वाचे आणि कालमर्यादित

विषय: महाडीबीटी स्कॉलरशिप / फ्रीशिप ऑनलाईन अर्ज भरणेबाबत...

संदर्भ: १. एमएमसीसी/महाराष्ट्र स्टेट स्कॉलरशिप/२०२५–२०२६/२४३, दिनांक ०६/१२/२०२५
२. एमएमसीसी/महाडीबीटी/स्कॉलरशिप फ्रीशिप/२०२५–२०२६/२६९, दिनांक २४/१२/२०२५
३. दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी सर्व अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज भरणेबाबत Google Meet द्वारे मार्गदर्शन सत्र

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील पात्र मागासवर्गीय, अल्पसंख्याक, खुल्या व ईडब्ल्यूएस प्रवर्गातील विद्यार्थी तसेच "उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी मोफत शिक्षण योजना" अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, स्कॉलरशिप /फ्रीशिप अर्ज भरण्याबाबत यापूर्वी संदर्भ क्र. एमएमसीसी/महाराष्ट्र स्टेट स्कॉलरशिप/२०२५–२०२६/२४३, दिनांक ०६/१२/२०२५ तसेच एमएमसीसी/महाडीबीटी/स्कॉलरशिप फ्रीशिप/२०२५–२०२६/२६९, दिनांक २४/१२/२०२५ अन्वये नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

सदर नोटीसनुसार FRESH तसेच RENEWAL अर्ज https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी सर्व अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज भरणेबाबत Google Meet द्वारे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत अचूक व पूर्ण अर्ज महाविद्यालयात जमा करण्याबाबतही सूचित करण्यात आले होते.

तथापि, अद्यापही अनेक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेले नाहीत, असे महाविद्यालयाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांना अंतिम सूचना देण्यात येते की, त्यांनी दिनांक **२८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत शिष्यवृत्तीचा ऑनलाईन भरलेला अचूक व पूर्ण अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागात प्रत्यक्ष जमा करावा.**

अर्ज स्वीकारण्याची वेळ: सोमवार ते शनिवार, सकाळी ११.०० ते दुपारी १.००

विद्यार्थ्यांनी निर्धारित कालावधीत अर्ज सादर केल्यास, प्राप्त अर्जांवर योग्य ती कार्यवाही करणे महाविद्यालयास सुलभ होईल व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ वेळेत मिळण्यास सहाय्य होईल.

पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज न भरल्यास किंवा मागे पाठविलेल्या अर्जांवरील त्रुटी वेळेत दुरुस्त न केल्यास, विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील व संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरणे बंधनकारक राहील. याची कृपया नोंद घ्यावी व सदर नोटीस सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी गांभीर्याने घ्यावी.

श्रीमती. हर्षला वाडकर
प्रशासन अधिकारी

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

डॉ. किशोर एस. निकम
प्राचार्य

प्रत: १. प्रत माहितीसाठी व सर्व विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते की सदरची नोटीस सर्व विद्यार्थांच्या नजरेस आणून द्यावी व त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना कार्यवाही करणेबाबत सुचना देण्यात याव्या.